नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 20/08/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील चिरवा शिवार येथे दिनांक 18/08/2021 चे 06.00 वा. ते दिनांक 19/08/2021 चे 06.00 वा. सुमारास फिर्यादी नामे— शिवराम संपत राजगिरे, वय 60 वर्ष, रा. चिरवा ता. मौदा यांनी आपले शेतात गोडावुन बांधकाम करणे करीता 50 सिमेंट च्या बोऱ्या किंमती 15,000/—रू. व 09 क्विटंल 08 एम.एम. 10 एम.एम. 12 एम.एम. चे लोखंडी सलाखी (लोहा) किंमती 36,000/—रू. असा एकुण 41,000/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री ठाकुर मों.न. 7083151993 हे करीत आहे.

## फसवणुक

1) पो.स्टे. बोरी :— अंतर्गत 2 कि मी अंतरावर व्यंकटेश सिटी शिरूळ येथे दिनांक 17/08/2013 ते दिनांक 19/08/2021 दरम्यान आरोपी नामे— 1) महेन्द्र तुलसीराम गवई, 2) विजय आनंदराव शेळके, 3) निश्चय शेळके, 4) विवेक साठे व 5) नितीन गेडाम सर्व रा. नागपूर यांनी व्यंकटेश सिटी मॅक्सीमायझर प्र.लि.चे ले आउट मधील खसरा क 116,प.ह.न.71 मधील एग्रीमेन्ट करून दिलेली जागा त्यांचे मालकीची नसतांना फिर्यादी नामे— अकील अहमद सयद मोहम्मद रब्बीर अहमद, वय 52 वर्ष, रा. ए—2/1118 टावर 10 पुर्वीचल रायल पार्क नोयडा सेक्टर 137 गौतम बुध्द नगर उत्तर प्रदेश, ह.मु विल्लायासीन गार्डन बिलींग न.24 झोन 47 स्पीट—910 अल्थुमामा दोहा (कतार) व त्याचे नातेवाईकांकडून एकुण 51,52,000/—रू. चेक व्दारे घेवुन खोटे एग्रीमेन्ट करून दिले आहे व त्याची फसवणुक केली. त्याच प्रमाणे फिर्यादीचे मित्र अनवर करिम रा. बिहार व नुर आलम रा. कलकत्ता यांचे कडून सुदधा अश्याप्रकारे मौजा शिरूळ खसरा क 116, प.ह.न.71 मधील प्लॉट करिता अनुकमे 7,00,000/—रू. व 20,00,000/—रू. घेवुन जागेचे एग्रीमेट करून दिले. परंतु विकीपत्र करून दिले नसुन फसवणुक केले. फिर्यादी व त्याचे नातेवाईक मित्र यांना आरोपीतांनी संगणमताने वरिल मौजा शिरूळ शिवारातील ले आउट त्यांचे मालकीचे आहेत असे खोटे सांगुन तेथील प्लॉट करिता एकुण कि. 78,52,000/—रू. घेवुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 420, 468, 471 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री साखरकर मो.कं. 7350902100 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर भिवापुर येथे दिनांक 31/01/2019 चे 00.00 वा. ते दिनांक 19/08/2021 चे 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शिवारामा मोहनराव सत्यनारायण उर्मी, वय 71 वर्ष, रा नांदुरा जि. बुलठाणा व ईतर प्लॉट धारक लोकांची आरोपी 1. मो तोहिद हनिफ जादा, रा. देसाईगंज वडसा जि. गडचिरोली ह.मु सुरत, 2. मिर्झा नदीम शमीन बेग, रा. भिवापुर, 3. ईरशाद चांद शेख, रा. भिवापुर व 4. अज्ञात डाकुमेंट रायटर यांनी फिर्यादी व इतर लोकांना फिर्यादी यांचे शेतामध्ये असलेल्या ले आउट मधील प्लॉट बाबत बनावट नकाशा दाखवुन खोटी माहिती देवुन स्वतः शेतमालक असल्याचे भासवुन शेती एन.ए. नसतांना शेता मध्ये प्लॉटचा नकाशा तयार करून शेती ताबा व खरेदर संबधाने कागदपत्रे लोकांना दाखवुन फिर्यादीचे शेतातील एकुण 72 प्लॉटची लोकांना विकि केलेले आहे व त्यांचे कडुन अवैध्य रक्कम वसुल केलेली आहे प्लॉट खरेदी करणारे लोकांची अंदाचे 1 कोटी 80 लाख रूपयाची फसवणुक केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 420, 426, 447, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री भस्मे मो.नं. 976494608हे करीत आहे.

3) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर नविन बस स्टँड जवळ खापरखेडा रोड पारशिवनी येथे दिनांक 20/07/2021 चे 12.00 ते दिनांक 04/08/2021 चे 22.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– वैभव वसंतराव वांढे, वय 20 वर्ष रा प्रभाग क्र. 1 नविप बस स्टाप जवळ खापरखेडा रोड पारशिवनी यांचे आईचे नावाने श्री गुरूदेव ॲग्रो एजेंसी नामक कृषी सेवा केंद्र असुन फिर्यादी यांनी खाताचे घेण्याकरिता ऑनलाईन सर्च करून www.fertilize renchies.com या वेबसाईट वरिल आरोपी नामे– अमित कुमार नावाचा अनोळखी इसम याने तयार केलेल्या IFFCO कंपनीच्या बनावटी साईडवर संपर्क केला असता यातील अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीची ऑनलाईन, ई.मेल, व्हॉटसॲप व मोबाईल फोनव्दारे संपर्क साधुन IFFCO कंपनीचा खताची डिलरशिप/ फ्रेन्जईजी देण्याचे आमिष दाखविले. तसेच युरीया खताची खरेदी करण्यासाठी फिर्यादीस IFFCO कंपनीच्या वेगवेगळया बॅक खात्यात रक्कम जमा करण्यास सांगितल्याने फिर्यादी यांनी त्यांचे आईचे स्टेट बॅक ऑफ इंडिया व बॅक ऑफ इंडिया शाखा पारशिवनी येथील अकाउंट मधुन दि. 22/07/2021 ते दि. 04/08/2021 दरम्यान एकुण 1,95,618/–रू. IFFCO कंपनीचे वेगवेगळया बॅक खात्यात RTGS व्दारे जमा केले. आरोपीतांनी फिर्यादीचे ऑर्डरप्रमाणे युरीया खताचे पैसे घेवुन सुध्दा खरेदी केलेले युरीया खत तसेच IFFCO कंपनीच्या खताची डिलरशिप/ फ्रेन्जईजी न देता फिर्यादीची ऑनलाईन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66(सी), 66(डी) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संदीप कडु 9823722418 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर